# नियमित दरखास्त क्र. ४८/२००७ मधील
# निशाणी क्र. ४१ वर आदेश

१. सदरचा अर्ज दरखास्तदाराने जाबदार क्र. १(ड) च्या वारसांना प्रकरणामध्ये समाविष्ट करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरणातील जाबदार क्र. १(ड) हे दि. ०१/०६/२०१३ रोजी मयत झालेले असून अर्जात नमूद किसन हे तिचे वारस आहेत. सदर प्रकरणातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता जाबदार क्र. १(ड) च्या वारसांना प्रकरणामध्ये समाविष्ट करणे आवश्यक असल्याने अर्ज मंजूर करण्याची दरखास्तदाराने शेवटी विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जाला इतर जाबदारांनी म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज जाबदारांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

३. सदर प्रकरणामधील दरखास्तदारतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून आणि दरखास्तदारतर्फे विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरून सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरची दरखास्त ही दरखास्तदाराने नियमित दिवाणी मुकदमा क्र. १५३/०६ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दाखल केलेली असून सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. १५३/०६ मधील हुकूमनाम्यामध्ये प्रतिवादींना दावा मिळकतीचे खरेदीखत वादीच्या लाभात लिहून देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणात दाखल हुकूमनाम्याचे

स्वरूप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर प्रकरणातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता अर्जात नमूद व्यक्ती हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ४१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद मयत जाबदार क्र. १(ड) सुखशाला भिमराव खंडाळे हिच्या वारसांना मुळ दरखास्त अर्जामध्ये दुरूस्ती करून दरखास्तदाराने समाविष्ट करून दरखास्त अर्जाची दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/–

दि. १७/०६/२०१५. (शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.

*(.PDF copy)*